




# अजब लोकांची दुनिया

राजा कदम





ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अजब लोकांची दुनिया

(व्यंगचित्रे)

## लेखक : राजा कदम

# अजब लोकांची दुनिया

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अजब लोकांची दुनिया


## व्यंगचित्रकार : राजा कदम

सम्पर्क- “कंट्री पार्क”, फ्लॅट एफ / ५०१,

दत्तपाडा रोड, , बोरिवली ( पूर्व ), मुंबई ४०००६६

मो. ९३७२६८२२२५/ 9372682225

ई मेल -- : shardulkad@gmail.com, shardul.kadam@fedfina.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ मार्च २०२०



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**राजा कदम**



जन्म: १३ ऑगस्ट १९४३

शिक्षण: पदवीधर; पदव्युत्तर जर्नालिझम अँड पब्लिक रिलेशन चा डिप्लोमा.

नोकरी: एका मोठ्या पब्लिक सेक्टर कंपनीतून प्रथम श्रेणी अधिकारी म्हणून २००३ ला निवृत्ती.

आवड: वाचन; लेखन; चित्रकला रेखाटने वगैरे.

हायस्कूलला असल्या पासून वाचनाची आवड लागली. सुरुवातीस बाबुराव अर्णाळकर यांच्या पुस्तकांचा फडशा पाडला. धनंजय आणि छोटू रात्री स्वप्नात भेटायचे! कॉलेजच्या वाचनालयात जी. ए., जयवंत दळवी, आनंद यादव, पु.ल., दिलीप चित्रे, चि. त्र्यं. वगैरेंच्या लेखनाचा प्रभाव पडला. त्याच वेळी इंग्रजी कादंबऱ्यांचे बऱ्यापैकी वाचन झाले. जेम्स हॅडली, रॉबिन कुक, अल्बर्ट कामु, आयर्न रँड इत्यादींचे कल्पना विश्व आणि शब्द सामर्थ्य वाचून अवाक होत गेलो. मग स्वतःलाच ऊर्मी येऊ लागली. सुरुवातीस भाराभर लिहिलेल्या कथा साभार परत आल्या. नंतर "हंस" चे आनंद अंतरकर, "सत्य कथेचे" राम पटवर्धन," प्रपंच" चे माधव कानिटकर आणि कोकणचे माजी आमदार (कै) अप्पासाहेब; उर्फ राजाराम शिंदे या मान्यवरांचे उत्तेजन मोलाचे ठरले. स्वभावातील भिडस्तपणा मुळे योग्य वयात, वेळी समोर आलेल्या कला क्षेत्राकडे वळलो नाही. परिणामी नुकसान झाल्या बद्दल सोस नाही. प्रापंचिक अडचणी कोणास नसतात? या कारणांना अर्थ नाही. आळसा मुळे बरेच लेखन पडून राहिले. हरवले. असो!

आधुनिक तंत्रज्ञानाचा माझ्या दोन्ही मुलांचा अनुभव फार उपयुक्त ठरला.

लेखन प्रपंच: पहिली कादंबरी "सारं काही" मॅजेस्टिक ने प्रसिद्ध केली. तिला १९८३ मध्ये प्रथम प्रकाशनाचा उत्तम लेखनाचा राज्य पुरस्कार मिळाला.

नंतर "घनदाट", "आता कुठली सुख निद्रा", "कैफियत" या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

"ए ब्रोकन स्टेप" ही इंग्रजी कादंबरी बूक गंगा वर प्रसिद्ध झाली.

"अवशेष" कादंबरी मेहता प्रकाशनाने प्रसिद्ध केली. तिला २००९ मध्ये सर्वोत्कृष्ट मराठी कादंबरीचा श्री. ना. पेंडसे राज्य पुरस्कार मिळाला.

याच कालखंडात जवळपास ४० कथा प्रसिद्ध झाल्या. यातील निवडक कथा दिवाळी अंक, बक्षीस पात्र आहेत. त्यांचा एकत्रित कथासंग्रह निघू शकेल.

सन २०१० ते २०१३ मध्ये मी रेखाटलेली २०० च्या वर व्यंग चित्रे "ग्लोबल मराठी" मध्ये प्रसिद्ध झाली. त्यातील काही चित्रांचे पुस्तक रूपाने प्रकाशन आज होत आहे. आपल्या अभिप्रायांनंतर इतरही चित्रे पुस्तक रुपाने येतीलच.

धन्यवाद.

राजा कदम

९३७२६८२२२५/ ९८१९३६६८६९

अर्पण पत्रिका

उपजत कलागुण घेऊन आलेल्या माझ्या तीन अंकुरांना


अपूर्वा, खुशी आणि आदित्य यांना

प्रेमपुर्वक

# अजब

# लोकांची

# दुनिया



"तुमचं एकट्याचं स्केच काढायचं असेल तर आमचा चार्ज रुपये शंभर.
तुमच्यासकट कुत्र्याचंही स्केच काढायचं असेल तर शंभर रुपये अधिक.
म्हणजेच, आमच्या आर्टमध्ये तुमची आणि कुत्र्याची किंमत एकच."

राजा कदम.

१६-५-२०१३




"ए! शहाणी असशील तर त्या घरात तुझ्या मुलीला देऊ नकोस. मुलाचा बाप बघ कसा, प्राणसारखा दिसतोय!"

राजा कदम.
१५|४|२०१३



"हे! खरं सांग. चॉकलेटं खिशात लपवून कशी खातोस?"


राजा कदम.
८. ७. २०१३



०००० कम्माल आहे! आई पप्पांना, "बाबा" म्हणते आणि पप्पा आईला "बेबी"! कॉम्प्युटरच्या या जगात कुटुंबातली माणसं स्वतःची ओळख विसरलेली दिसतात! ००००

राजा कदम.


९.८.२०१३



... आणि आमचे हे पपा! ऑफीसमध्ये तीनशे माणसं माझ्या हाताखाली काम करतात म्हणे! घरात साधा डायपर बांधता येत नाही! ...


राजा कदम.

२६.६.२०१३



"एक मिनिट! माझा बॉल लपवला आहेस का बघायचंय."

राजा कदम.
२६.५.२०१३.



पंड्या — "आई, आयो, मॉम, ममा, मम्मी, मा ——————"

आई (चिडून) — काय?


पंड्या — काही नाही. ही: ही: ही:!"

राजा कदम.

२८.६.२०१३





राजा कदम.
२८.६.२०१३.



मोठा डास — बेटा, आयुष्यात पहिल्यांदाच तू आज या रूमभर
उडत जाऊन परत आलास. तुझा अनुभव सांग!
छोटा डास — डॅड! इट वॉज सो एक्सायटींग! मी उडताना
रूममधलं प्रत्येक माणूस मला बघून टाळ्या वाजवीत होतं!


— राजा कदम.
२८.६.२०१३.



"आई! सकाळपासून त्यानं चारवेळा आईस्क्रीम खाल्लं आणि मी मात्र तुझे फटके खातोय!"

राजा कदम.

२-७-२०१३



००० पप्पांनी स्वतः जाऊन रक्तदान केलं खरं, पण परतफेड म्हणून त्या लोकांनी पप्पांना भलतंच इंजेक्शन तर दिलं नाही? ०००

राजा कदम.

30.६.२०१३.




"डॅड! आतातरी पी. सी. द्या! यापुढे आमचे प्रोग्रेस रिपोर्ट्स ई-मेल करणार आहेत!"

राजा कदम.
३.५.२०१३





राजा कदम.
२.५.२०१३



"पप्पा! तुमची चाल, गुर्मी, दादागिरी! स्वतःला नाना पाटेकर समजता काय?

राजा कदम.
५.७.२०१३.




"घरातलं सगळ्यात खतरनाक माणूस इथे पोचलेलं आहे.
आता आपले दिवस संपले!"

राजा कदम.
९-८-२०१३



००० आपल्या जगात सगळीकडे शांत समृध्द जीवन असावं असा संदेश घेऊन आलोय खरा पण — काही दिवसांतच इथला कर्कश्य गोंधळ बघून तोंडात अंगठा घालायला झाला! ०००

राजाकदम.
२३.५.२०१८




००० लज्जारक्षण म्हणून केसाला घट्ट बो बांधलाय, ओके?
आता तुमची काही हरकत? ०००

राजा कदम.
२५|६|२०१३




००० आणि आमचे हे पप्पा! साधा डायपर बांधता येत नाही
आणि म्हणे ऑफिसमध्ये मी मोठा अधिकारी आहे! ह्यॅ! ०००

राजा कदम.
२६.६.२०१३.



"श्रीकृष्णानं तोंड उघडून ब्रम्हांड दाखवलं. पण तुझ्या तोंडात नक्कीच
चिंच्या आहेत. तोंड उघडतोस की फटके खायचेत?"


राजा कदम.
२१-६-२०१३




"साहेब! वायरलेसमध्ये शांतपणे बसून, चोरांनी बँक लुटताना, नोटांच्या थैल्या त्यांच्या कारमध्ये ठेवून सगळ्यांनी एकत्र गाडीत बसल्यावर आम्ही त्यांना रंगेहाथ पकडलेलं आहे! आता त्यांच्या कारला खेचून आम्ही स्टेशनला येत आहोत! हा: हा:!"

—राजाकदम.

२०.५.२०13




"हॅलो! तुमचं हे रंगीबेरंगी रूप आणि तुमची मॉडर्न आर्ट, या गोष्टींची भीती वाटून लहान मुलं गार्डनमध्ये यायला घाबरतात. तेव्हा — निघा!"

राजा कदम.
१८.६.२०१३




"हायवेवर अपघात झाला तेव्हां तीन जखमींना तुम्ही स्वतःच्या गाडीतून लगेच हॉस्पिटलात नेलेत त्याबद्दल धन्यवाद. परंतु हे करताना ट्रॅफिकचं उल्लंघन केलंत आणि तुमच्या रक्तात प्रमाणापेक्षा अधिक अल्कोहोल दिसल्यामुळे आम्ही तुम्हाला अटक करीत आहोत."

राजा कदम.
८-५-२०१३.



"हं, साहेब! डावीकडचा सिग्नल मिळाला. आजपण तेच हॉटेल, तोच रूम का? या कालच्या बाई दिसत नाहीत! परवाच्या छान साडीत होत्या, नाही का?"

राजा कदम.

८.६.२०१३




"साहेब! आयशप्पथ, ही पनवती विटनेस म्हणून तुम्हाला नेमकी कुठं सापडली? पाच पानं लिहून झाली पण याच्या अतिशुद्ध मराठीमुळे याला नक्की काय म्हणायचंय ते अजूनही माझ्या टकलात शिरलेलं नाही!"

राजा कदम.

११.६.२०१३




"साहेब, आपल्या डिपार्टमेंटच्या मॉडर्न आर्टीस्टने सस्पेक्टचे स्केच पाठविले. आम्हाला अर्थ कळला त्यानुसार आम्ही सहा आयटम्स पकडले आहेत ते आपण बघून घ्या!"

राजाकदम.
२.६.२०१३



"एवढ्या मोठ्या सभेत, 'माझ्याविषयी तुमचं काय मत आहे?' असा खुळचट प्रश्न विचारून जनतेचा कौल घ्यायचा असतो काय पुढारी साहेब?"


राजा कदम.
३.६.२०१३



"इथून खाली उडी मारायची नाही. कळलं? घरातला टी.व्ही. इतका जुना झालाय की काही पडलं तरी चालू चॅनल लगेच बदलतो आणि माणसं खवळतात!"


राजा कदम.

३१.५.२०१३




" ही माझी अंडी आहेत. माझी मुलगी सासरी आहे तिला पिलं होत नाहीत म्हणून पार्सल करायचीत. कळलं? "

— राजा कदम.
२८. ५. २०१३




"अंगावरचा कोट काढून क्रमांक तीनची स्पर्धक फॅशन शो साठी उतरली आहे. हा हिंदी सिनेमातील 'आयटम साँग' पाहिल्याचा परिणाम. हे सभ्यतेला धरून नाही आणि तिला शो मधून लगेच काढून टाका!"

राजा कदम.


२५.५.२०१३



"अहो! आज स्पॉट फिक्सिंग आहे, माहीत आहे ना? मैदानात गेल्यावर बुकीला सिग्नल म्हणून पँट खाली सरकल्यासारखं करायचं आहे. धांदरटपणा नको. आत निकर घातलीय का?"

राजा कदम.

१०-५-२०१३



"हॅलो हॅलो मिस गोडबोले, तू फ्लाईट ड्यूटीवर आहेस ना? गुड. मी चहा पीत असताना आपलं विमान उडालं! बट डोंट वरी. तू केबीनमध्ये जाऊन मॅन्युअल बघत पायलटींग कर. ओके? मी फोनवर आहे ना! गो अहेड!"


राजा कदम.

१८.५.२०१३.



"तेरी खातिर फरिश्ते, सर पे इल्जाम लेंगे,
हुस्न की बात चली तो, सब तेरा नाम लेंगे।"

राजाकदम.
२८.५.२०१३.



"या घरात माझे चार नातू आहेत. गेल्या आठवड्यात मी झोपलो असताना त्यांनी माझा उरलेला सोन्याचा दात काढला, विकला आणि त्यांच्यासाठी क्रिकेटच्या ब्याटा, स्टँपा आणि चेंडू विकत घेतले!"

राजा कदम.
६/५/२०१३




" डॉक्टर काहीतरीच काय सांगताय! वजन कमी केलं नाही तर मेंदूवर प्रेशर कसं येईल? मेंदू काय पायाच्या घोट्यात आहे तर त्यानं बॉडी वेट घ्यायला! तो तर डोक्यात फिट बसलेला आहे. म्हटलंच तर, पायाच्या घोट्यात किडनी आहे तिच्यावर प्रेशर येईल कदाचित."


राजा कदम.
५/५/२०११




चित्रगुप्त — "हे वत्सा, तू बोकड आहेस म्हणतोस आणि तुला मुक्ती हवीय
पण तुझे नुसते खूरच दिसत आहेत. तुझं संपूर्ण शरीर
कुठं आहे बरं?"

बोकड — "हे प्रभो, पृथ्वीतलावर मालवणी म्हणून एक जमात आहे
त्यांनी मला हाडांसकट मटक मटक खाऊन टाकलं आहे हो!
काही काहीही शिल्लक ठेवलं नाही. म्हणून माझ्याच खूरांना घेऊन
इथं आलो आहे!"


राजा कदम.
२०.४..




"मी तुम्हाला गेल्या आठवड्यातच सांगीतलंय की चोर तुमच्यापेक्षा उंच, देखणा, गोरा आणि सडपातळ होता. खप्पड, टकलू, ढेरपोट्या नव्हता. इतकं वर्णन करूनही तुम्ही त्याला पूर्ण आठवड्यात पकडू शकला नाही? कम्माल झाली बाई!"

राजा कदम.

२६/७/२०१३




"इस्त्रीसकट आणखी चार वस्तू तुमच्यापुढे आहेत. तुम्हाला तुमच्या चेहऱ्याचा आकार कसा हवा आहे ते ठरवा. वाटोळा? त्रिकोणी? चौकट उभा?...?...? मगच फॉर्म भरा. ठीक है?"

राजा कदम.
२२.४.२०१३

"अजब लोकांची दुनिया ....



"सर! मी तुमचा मराठीचा जुना विद्यार्थी. ओळखलंत? डॉक्टर म्हणतो की तुम्ही ठणठणीत आहात. पण तुमच्या मुलाला अर्जंट पत्र पाठवायला मला सांगितलंय. सर, चितेतला 'ची' ऱ्हस्व की दीर्घ ते पटकन् सांगून टाका बरं!"

राजा कदम.

2·3·2013


अजब लोकांच्या दुनियेत ....




"माझ्यानंतर बँकेतल्या लॉकरमध्ये ठेवलेले मृत्यूपत्र माझ्या मुलाला द्यावे, असे तुमच्या वडिलांनी बँकेला कळविले होते. तुम्ही आलात, धन्यवाद. आता तुमची लॉकरची चावी द्या बरं! वडिलांनीच मला इथे पाठवलंय!"

– राजा कदम.
3.3.2013

अजब लोकांची दुनिया.....



"या मोबाईल इंटरनेटचा फंडा कळतच नाही! बघ ना, माझ्या मोबाईलवर या मॉडेलचा फक्त पाव भागच दिसेताय. म्हणजे, तिला पूर्ण बघायची असेल तर आपल्या चौघांचे मोबाइल्स एकत्र हवेत. त्यातून एक पुण्याला दुसरा मुंबईला असेल तर, बोंबला ... असंच ना?" ——— राजा कदम.

3.3.2013


अजब लोकांची दुनिया....




"मॉम, माझ्यासाठी इतके ड्रेस घेतलेस. मग डॅड इंटरनेटवर इतक्या मुली बघतात त्या बिच्चाऱ्यांसाठी साधं कापड तरी घे!"

राजा कदम.
४.३.२०१३

## अजब लोकांची दुनिया....



"टी॰व्ही॰ वरच्या काही मालिकांतला बाष्कळ 'इनोद' आणि त्यांच्या ग्रुपमधल्या काही महिलांनी तोंड उघडून व्यक्त केलेलं आश्चर्य, ही आमच्या घरातल्या मुलांना एक स्टाईल वाटू लागलीय आणि त्याचा ताप फार वाटतोय."

राजा कदम.
८.३.२०१३

अजब लोकांच्या दुनियेत...




"अंकलला अर्जंटली आठव्या मजल्यावर जायचं आहे. त्याला एकट्यालाच जाऊ दे. जागा कुठाय? पण आठव्या मजल्यावर त्याला बाहेर कोण खेचणार? आपण आठ जिने चढून थोडंच जाणार आहोत? अंकल आणि त्याचं अर्जंट काम... काय दिवे लावणार आहे ते त्यालाच माहीत!" — राजा कदम.

५.३.२०१३

अजब लोकांची दुनिया....




"आमची ट्रॅव्हल एजन्सी 'नॉन स्टॉप' म्हणून प्रसिध्द आहे. आता धावत्या गाडीत बॉम्ब ठेवला असं कळल्यास शांत रहा. खिडकीपासून आत सरका, दोन्ही गुडघ्यात मान घाला आणि डोळे मिटून शेवटचे क्षण मोजा. एवढंच!"

राजा कदम.
५.३.२०१३



"My

"My hubby is so loving. He won't allow me near the stove. I told him there was a gas leak and he has gone into check with a lightted matchstick"

28/3/13




TYPED — 'ENCLOSED MANAGER!'

"Excuse me madam! I-I am from the Dispatch section. You have signed this letter and it says here Encl. Manager"

28/3/13.




"Hey, Do you guys sell the Fidelity Guarantee Insurance Policy ?... I think my girlfriend is cheating on me!"

2013/13

अजब लोकांची दुनिया....



"आजोबा, ए टू झेड टेकनॉलॉजी चीनला माहीत आहे. त्यांनीच कॉम्प्युटरच्या जगाशी व्यापार केलाय. त्यांना २०५० पर्यंत महासत्ता करायची आहे. समजा, आज आपण जगभर कॉम्प्युटर्स वापरतोय त्यात त्यांनी एखादी सूक्ष्म 'चिप' ठेवून दिली असेल, जी स्तर कोणालाच माहीत नाही. पण ती फक्त सन २०५० मध्येच ट्रिगर होईल आणि जगाचे व्यवहार 'हॅक' होऊन कोसळतील आणि नाड्या चीनच्या हातात गेल्या तर? युद्ध न करता डोळे मिटलेल्या हसऱ्या चेहऱ्याने ते राज्य करतील आजोबा!"

'~~कोड~~


— राजाकदम.

6.3.2013

"Grandpa!! Did you know that China has declared that it intends to be the Super power by 2050? with China being the sole provider for all Computer chips used in all our computers, who is to say they have not already embedded a code that can hack to trigger the shutdown of all the computers all over the world in year ... will win the war and rule the world right under ...


'~~कोड~~'S

Raja Kadam



"OK ! So which one of you did I give the medicine today morning?"

Raja Kadam
11/3/2013



"Madam, off late you have been very insulting to me. Men are men you see!! If you want your marriage safe, ~~how~~ heavy make-up is not the solution. You have to change your attitude towards me."

Raja Kadam
14/3/2013



"This is what they call 'A total loss settlement' in insurance lingo..."

Raja Kadam
15.3.2013



"What happened to you?"
"I got run over by a commercial truck."
"That is very unfortunate. A private car would have fetched you more in claims..."

Raja Kadam
15. 7. 2013

पुण्याच्या खांद्यावर कुणाचे ओझे . . . . .




"साहेब! माझ्या मैत्रिणीनं सांगितलेल्या बसस्टॉपवर मी तीन तास उभा होतो. पण तो बसस्टॉपच हरवलेला आहे! याचा फायदा घेऊन मैत्रीण दुसऱ्याबरोबर निघून गेली! हे केवळ बसस्टॉप हरवल्यामुळेच झालं ना! बेस्ट मॅनेजमेंट विरुध्द माझी तक्रार घ्या."

राजा कदम.
९/२/२०१३

मायान कॅलेंडर आणि (गैर) समज.



"मित्रांनो! देवांच्या कम्युनिटीचं पृथ्वी नावाच्या ग्रहावर [illegible] वर्चस्व आहे. २१.१२.२०१२ ला पृथ्वीवरचं जीवन नष्ट होऊन सगळे अतृप्त आत्मे आपल्या संघटनेत येऊन देव कम्युनिटी मायनॉरिटीत गेली असती. असं होऊ नये म्हणून देवांनी पृथ्वी शाबूत ठेवलीय! आपण त्यांचा धिक्कार करूया!"

— राजा कदम
3.2.2013

कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे....




"हे पाहा, बाहेर जो कोणी आला आहे तो एका टी.व्ही. मालिकेमध्ये पंधरा पैकी बारा वर्षे सतत अभिनय केल्याचं म्हणतोय. त्यास म्हणावं की आमच्या नवीन मालिकेत ठोकळे नकोत! नुकती आम्ही नवोदितांसाठी अभिनय कार्यशाळा सुरू केलीय त्यात भरती हो."

— राजा कदम.
6.2.2013

कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे.....



"जोशी भटजी आहेत का? तीसवर्षांपूर्वी छत्तीस गुण जमतात म्हणून लग्नपत्रिका त्यांनी जुळवून दिली पण इतक्या वर्षांत एक दिवस भांडणाशिवाय गेला नाही! जरा जोशींना भेटायचं होतं!"

राजा कदम.
९.२.२०१३

कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे....



"'मि. भोंदूराव वरचेवर पकण्यात या वर्षीही शेवटी आले' हे वाक्य तुम्ही पेपरामध्ये क्रीडांगण विभागात टाकले आहे. या प्रसिद्धीचा मला खूप त्रास होत आहे. कारण, 'वरचेवर' हे माझे आडनाव आहे मिस्टर!"

— राजा कदम.
१०.२.२०१३

कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे . . . . .




"ओके ओके! तुमचं आधार कार्ड आहे हे आम्हाला कळलंय. पुढची एन.आर.आयसी, एन.पी.आर कार्ड, आर.आय.सी. कार्ड तुमच्याशी कोणी मागणार नाही. झालं? आता पाचव्या मजल्यावरून उडी न मारता मुकाट्यानं खाली उतर बघू! सरकारच्या या उलटसुलट योजनांना आम्ही पण कंटाळलो आहोत."

—— राजा कदम.
११. २. २०१३


अजब लोकांची दुनिया...



"दहा मिनिटांपूर्वी गाडी रिव्हर्स घेताना बंप झाल्यासारखी वाटली. रस्त्यात स्पीडब्रेकर तर नव्हता! आपला बंड्या मागच्या सीटवर बसला आहे ना?"


राजा कदम.
२८.२.२०१३

"अजब लोकांची दुनिया...



"अपघातामुळं माझा चेहरा पूर्ण बिघडला. प्लास्टीक सर्जरीत स्कीन ग्राफ्टींग झालं.
— पण चेहऱ्यासाठी कोणाची आणि त्याच्या कुठल्या भागाची स्कीन वापरलीय देव जाणे.
आता कामामुळे चेहऱ्यावर थोडासा घाम आला तर — टॉयलेटचा वास येतो!"

राजा कदम.
२८. २. २०१३



००० हे! तुझी शेपटी कुठाय ? ०००

राजा कदम.
२८.६.२०१३.

एक चित्र एका पुस्तकाहून अधिक काही सांगते असे म्हणतात. महाराष्ट्राला तर चित्रकारांची फ़ार मोठी परंपरा आहे. आणि त्यातही व्यंगचित्रकारांची. बाळासाहेबांपासून ते फ़डणीस, ठोकळ, मंगेश तेंडुलकर, सरवटे, लचके अशा अनेक व्यंगचित्रकारांनी मराठी पुस्तके, नियतकालिके व दिवाळी अंक सजवले. किंबहुना अनेकदा नियतकालिकांचे प्रमुख आकर्षण व्यंगचित्रेच असतात.

परंतु व्यंगचित्रांची पुस्तके मराठीत (काही सन्माननीय अपवाद वगळता) कमीच. याचे कारण व्यावहारिकता. त्यांना येणारा खर्च.

ई साहित्यने मात्र इंटरनेटच्या खुबींचा फ़ायदा घेत व्यंगचित्रकलेची पुस्तके प्रकाशित करायला घेतली आहेत. विवेक मेहेत्रें, डॉ. शशांक परूळेकर, मयुरेश कुलकर्णी यांची व्यंगचित्रांची पुस्तके यापुर्वी प्रसिद्ध केली आहेतच. आज श्री राजा कदम यांचे पहिले व्यंगचित्रसंग्रहाचे पुस्तक प्रकाशित करत आहोत. ही मालिका अशीच सुरू राहील आणि नवनवीन व्यंगचित्रकार या मालिकेत सहभागी होतील. महाराष्ट्राची व्यंगचित्रकारांची परंपरा अजूनच बहरेल याची आम्हाला खात्री आहे.

**अशाच इतर पुस्तकांसाठी खालील लिंकवर क्लिक करा.**

http://www.esahity.com/23302367234023812352232523542366.html







